भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

**आरबीआय/२०११-१२/३७**
**युबीडी.बीपीडी.(पीसीबी) एमसी क्र. १ /१३.०५.०००/२०११-१२** **जुलै १, २०११**

सर्व प्राथमिक (नागरी) सहकारी बँकांचे
मुख्य अधिकारी.

महोदय/महोदया**,**

**महापरिपत्रक- एक्स्पोजर नियम आणि बंधनकारक/ अन्य निर्बंध- युसीबीज**

कृपया दिलेल्या विषयावरील आमचे दिनांक १ जुलै, २०१० चे क्र. युबीडी. पीसीबी. एमसी.१/१३.०५.०००/२०१०-११ महापरिपत्रक पाहा (जे भारतीय रिजर्व बँकेच्या वेबसाईटवर उपलब्धा आहे- www.rbi.org.in). सोबतच्या महापरिपत्रकामध्ये ३० जून, २०११ पर्यंत देण्यात आलेल्या ह्या विषयाशी संबंधित असलेल्या सर्व सूचना/ मार्गदर्शक तत्त्वांचा समावेश करण्यात आला असून परिशिष्टामध्ये त्याची सूची दिलेली आहे.

आपली

(उमा शंकर)
मुख्य महा व्यवस्थापक
सोबत : वरील प्रमाणे

**अनुक्रमणिका**


| अनु क्र | विषय |
|---|---|
| १. | सर्वसामान्य |
| 2 | वितरणाचे नियम (एक्स्पोजर नॉर्म्स) |
| | 2.1 व्यक्तिगत/ सामुहिक कर्जदारांना वितरण करण्याची मर्यादा (एक्स्पोजर सिलिंग) |
| | 2.2 व्याख्या |
| | २.३ जमिनी मालमत्ता (रिअल इस्टेट) क्षेत्रातील रकमेची मर्यादा |
| | २.४ आंतर- बँक रकमेची मर्यादा |
| 3 | असुरक्षित/अप्रतिभूतित अग्रिम रकमा (हमीसह आणि हमीशिवाय) |
| | ३.१ एक पक्ष/ संलग्न समूहासाठी असलेली मर्यादा |
| | ३.२ असुरक्षित अग्रिम रकमेवरील एकूण मर्यादा |
| 4 | ४. बंधनकारक निर्बंध |
| | ४.१ बँकेच्या स्वतःच्या समभागांच्या विरुद्ध अग्रिम रकमा |
| | ४.२ कर्ज विमोचन करण्याच्या अधिकारांवरील निर्बंध |
| 5 | नियामक तरतुदी |
| | ५.१ संचालक आणि त्यांचे नातेवाईक ह्यांना कर्ज आणि अग्रिम रकमा देणे |
| | ५.२ सामान्य सदस्यांना अग्रिम रक्कम देण्यावरील महत्तम मर्यादा |
| | ५.३ बँकांनी अन्य बँकांनी दिलेल्या स्थायी ठेवीच्या/ टर्म डिपॉझिटसच्या अनुषंगाने अग्रिम रकमा मंजूर करणे टाळले पाहिजे. |
| | ५.४ ब्रिज लोन्स/ अंतरिम वित्तसेवा |
| | ५.५ समभाग, कर्जरोखे आणि रोखे ह्यांच्यासाठीची बँकेची वित्तसेवा |
| | ५.६ प्राधान्य समभाग आणि दीर्घ मुदतीच्या (दुय्यम) ठेवींसाठी बँकेच्या वित्तसेवा |
| | ५.७ बँकिंग व्यतिरिक्त असलेल्या आर्थिक कंपन्यांना (एनबीएफसीज) देण्यात येणारी बँक वित्तसेवा |
| | ५.८ उपकरण कर्जाऊ देणे आणि भाडे- विक्री ह्यास आर्थिक सेवा देणे |
| | ५.९ कृषी कार्यासाठी वित्तसेवा |
| | ५.१० बचतगटांना/ सामुहिक दायित्व गटांना (जेएलजीज) कर्ज |
| | ५.११ बंधनकारक बाकी रकमेच्या अग्रिम राशीवरील निर्बंधा |
| | जोडपत्र १ |
| | जोडपत्र २ |
| | परिशिष्ट |

**१. सर्वसामान्य**

१.१ कर्ज म्हणून देण्यात येणा-या रकमेतील जोखीम अधिक प्रमाणात राहू नये ह्यासाठी आणि त्याचे अधिक चांगले व्यवस्थापन करण्यासाठी, प्राथमिक (नागरी) सहकारी बँकांना त्यांच्याद्वारे देण्यात येणा-या रकमेवर मर्यादा निश्चित करण्याचा सल्ला देण्यात येतो.
- व्यक्तिगत आणि सामुहिक कर्जदारांसाठी,
- विशिष्ट क्षेत्रांसाठी
- असुरक्षित अग्रिम राशी आणि असुरक्षित हमीसाठी

१.२ त्याव्यतिरिक्त, बँकांना पुढील विशिष्ट बंधनकारक आणि नियामक निर्बंधांचे पालन करणे आवश्यक आहेः

(i) समभाग, कर्जरोखे आणि रोख्यांविरुद्धची अग्रिम राशी
(ii) समभाग, कर्जरोखे आणि रोख्यांमधील गुंतवणूक

१.३ ह्या सर्व घटकांशी संबंधित परिचालनाच्या वर्तमान सूचना पुढील परिच्छेदामध्ये दिलेल्या आहेत.

**२. वितरणाचे नियम (एक्स्पोजर नॉर्म्स)**

**२.१ व्यक्तिगत/ सामुहिक कर्जदारांना वितरण करण्याची मर्यादा (एक्स्पोजर सिलिंग)**
२.१.१ प्राथमिक (नागरी) सहकारी बँकांना त्यांच्या संचालक मंडळाच्या मान्यतेसह बँकेच्या भांडवली निधीच्या अनुषंगाने वितरण करण्याची मर्यादा निश्चित करणे आवश्यक आहे. ह्या उद्देशाने देण्यात येणा-या रकमा परिच्छेद २.२.२. (बी) मध्ये नमूद केल्याप्रमाणे दोन्ही प्रकारच्या कर्जासाठी असतील (कर्ज, गुंतवणूक व अग्रिम राशी ह्या रकमा) (एसएलआर नसलेल्या) व त्यामुळे-

(i) व्यक्तिगत कर्जदारासाठी देण्यात येणारी रक्कम भांडवली निधीच्या १५ टक्के पेक्षा अधिक असणार नाही; आणि
(ii) सामुहिक कर्जदारांसाठी देण्यात येणारी रक्कम भांडवली निधीच्या ४० टक्के पेक्षा अधिक असणार नाही.

२.१.२ रक्कम देण्याची मर्यादा ठरवण्याचे काम दर वर्षी बँकेचे लेखा परीक्षण होऊन ताळेबंद पत्रकाला अंतिम स्वरूप केल्यानंतर केले जाऊ शकेल आणि रक्कम देण्याच्या मर्यादेबद्दल कर्जास मान्यता देणा-या यंत्रणेला व बँकेतील गुंतवणूक विभागास सल्ला दिला जाऊ शकेल.

समभागांना उसने देण्याबद्दल, ताळेबंद पत्रक दिनांकानंतर भाग भांडवलामध्ये वाढ किंवा तूट होणे हे अर्धा वार्षिक कालावधीनंतर रक्कम देण्याची मर्यादा निश्चित करण्यासाठी संचालक मंडळाच्या मान्यतेसह विचारात घेतले जाऊ शकेल. त्यानुसार, बँका गरज भासल्यास ३० सप्टेंबर रोजी उपलब्धा असलेले भाग भांडवल विचारात घेऊन रक्कम देण्याची नवीन मर्यादा निश्चित करू शकतात. परंतु तरीही भाग भांडवलाव्यतिरिक्त अर्धा वार्षिक नफ्यासारख्या अन्य भांडवली निधीतील वाढ रक्कम देण्याची मर्यादा बदलण्यासाठी लागू नसेल. तसेच, भविष्यातील भांडवलाच्या गरजेच्या संदर्भात आवश्यक असलेल्या मर्यादेच्या बाहेर रक्कम देण्याची मर्यादा जात नाही, हे बँकांद्वारे निश्चित केले जाणे आवश्यक आहे.

**२.२ व्याख्या**
२.२.१ भांडवली निधी
रक्कम देण्याच्या नियमांच्या संदर्भात भांडवली निधीमध्ये आपल्या भांडवली उपलब्धता (कॅपिटल एडिक्वसी) ह्यावरील महापरिपत्रकामध्ये व्याख्या केलेल्या स्तर १ (टायर १) आणि स्तर २ ह्या दोन्ही भांडवलांचा समावेश होईल.

२.२.२ देण्याच्या रकमेमध्ये दोन्ही रकमा - कर्ज देण्याच्या रकमा (कर्ज आणि अग्रिम राशी) आणि गुंतवणूकीसाठी देण्यात येणा-या (नॉन एसएलआर) रकमा ह्यांचा समावेश पुढे नमूद केल्याप्रमाणे असेल.

**२.२.२.१ कर्ज देण्याची रक्कम (क्रेडिट एक्स्पोजर)**

(i) कर्ज देण्याच्या रक्कम ह्याप्रमाणे असेल-

(a) निधी असलेल्या आणि विना निधी कर्ज मर्यादा आणि त्यानुसार हमी असलेल्या व तसे अन्य दायित्व

(b) उपकरण उसने देऊन आणि विकत घेऊन भाडेतत्त्वावर देऊन मिळवण्यात आलेल्या सुविधा, आणि

(c) आपत्कालीन आवश्यकतेसाठी कर्जदारांना वेळोवेळी मान्य केलेल्या मर्यादा (एड हॉक लिमिटस)

(ii) कर्ज देण्याच्या रकमेमध्ये बँकेच्या स्वतःच्या त्या कालावधीतील जमा रकमेच्या सुरक्षिततेसह देण्यात आलेल्या कर्जांचा आणि अग्रिम राशींचा समावेश असणार नाही.

(iii) मान्य केलेली मर्यादा किंवा थकबाकी, ह्यापैकी जी अधिक असेल, ती कर्ज देण्याची मर्यादा निश्चित करताना गणना केली जाईल. तसेच, एखाद्या कालावधीतील पूर्णतः काढलेल्या कर्जांसाठी निर्धारित मर्यादेच्या कोणत्याही हिश्शाला परत करण्याची संधी नसेल, तर बँका कर्ज देण्याच्या मर्यादेस निश्चित करताना थकबाकीची गणना करू शकतात.

(iv) विना निधी कर्ज मर्यादेच्या संदर्भात, अशी १००% मर्यादा किंवा थकबाकी, ह्यापैकी जी रक्कम अधिक असेल, ती ह्या उद्देशासाठी विचारात घेणे आवश्यक आहे.

(v) संस्थात्मक (कोन्सोर्टियम)/ मल्टीपल बँकिंग/ नियामक मंडळ (सिंडिकेशन)
एका कर्जदाराच्या/सामुहिक कर्ज देण्याच्या रकमेच्या आधारे बँकेच्या समभागांची पातळी निर्धारित केली जाईल.

**गुंतवणूकीची रक्कम (नॉन एसएलआर)**

२.२.२.२ बँकांना 'ए' किंवा सममूल्य व उच्च मानक असलेल्या वाणिज्यिय पेपर्समध्ये (सीपीज), कर्जरोख्यांमध्ये आणि विमोचन करणे शक्य असलेल्या रोख्यांमध्ये गुंतवणूक करण्यास अनुमती आहे. परंतु तरीही नेहमी कर्जाऊ असलेल्या उपकरणांमधील गुंतवणूकीची अनुमती नाही. तसेच डेब्ट म्युच्युअल फंडस आणि मनी मार्केट म्युच्युअल फंडस ह्यामध्ये गुंतवणूक करण्याची अनुमती बँकांना आहे.

a) नॉन- एसएलआर जामीनामधील गुंतवणूक आधीच्या वर्षी ३१ मार्च रोजी असलेल्या बँकेच्या एकूण जमा रकमेच्या १०% इतकी मर्यादित असली पाहिजे.

b) सूचीबद्ध न केलेल्या जामीनामधील गुंतवणूका कधीही एकूण नॉन एसएलआर गुंतवणूकीच्या १०% पेक्षा अधिक नसाव्यात. जिथे बँकांनी आधीच ही मर्याला ओलांडली असेल, तर अशा जामीनांवर कोणत्याही वाढीव गुंतवणूकीची अनुमती नाही. युसीबीजद्वारे करण्यात आलेली नॉन एसएलआर कर्ज जामीनातील गुंतवणूक (प्राथमिक आणि दुय्यम मार्केटमधील) गुंतवणूक करताना विनिमय (एक्स्चेंजेस) मधील सूचीत दिलेल्या जामीनामध्ये सूचीबद्ध करण्याचा प्रस्ताव असेल, तर तिला गुंतवणूक म्हणून बघितले जाऊ शकेल. तरीही, जर जामीन निर्धारित कालावधीमध्ये सूचीबद्ध करण्यात आला नाही, तर तिची गणना सूचीबद्ध न केलेल्या नॉन एसएलआर जामीनासाठीच्या १०% मर्यादेमध्ये करण्यात येईल. जर सूचीबद्ध न केलेली नॉन एसएलआर जामीन गुंतवणूक केल्यामुळे १०% मर्यादेचे उल्लंघन होत असेल, तर जोपर्यंत सूचीबद्ध न केलेल्या नॉन एसएलआर गुंतवणूका १०% पेक्षा कमी होत नाहीत, तोपर्यंत युसीबीला नॉन एसएलआर जामीनासह नवीन गुंतवणूक करता येणार नाही.

c) वरील सर्व गुंतवणूकांना निर्धारित महत्तवपूर्ण स्वतंत्र/ समूह देण्याच्या रकमेच्या मर्यादा लागू असतील.

d) नॉन- एसएलआर प्रवर्गातील सर्व नवीन गुंतवणूकांचे वर्गीकरण फक्त व्यापारासाठी धारण केलेल्या (एचएफटी) आणि विक्रीसाठी उपलब्धा (एएफएस) प्रवर्गातच केले गेले पाहिजे. तरीही, पायाभूत प्रकल्पाची अंमलबजावणी करणा-या

कंपन्यांद्वारे जारी करण्यात आलेले दीर्घकालीन कर्जरोखे ह्यामध्ये गुंतवणूक केलेल्या व सात वर्षांची किमान शेष परिपक्वता असलेल्या युसीबीजचे वर्गीकरण एचटीएम प्रवर्गामध्ये केले जाऊ शकेल.

**समूह**

**२.२.३** समूहाच्या व्याख्येच्या संदर्भातील निर्णय बँकांच्या आकलनावर सोडून देण्यात आला आहे. सामान्यतः बँकाना त्यांच्या ग्राहकांच्या मूलभूत संरचनेबद्दल आकलन असते. त्यामुळे कर्ज घेणारे एखादे विशिष्ट एकक बनणारा समूह कसा ठरतो, ह्याचा निर्णय बँका त्यांच्याकडे त्या संदर्भात असलेल्या माहितीनुसार घेऊ शकतात आणि ह्या संदर्भातील मार्गदर्शक तत्त्व व्यवस्थापनामधील समानता आणि परिणामकारक नियंत्रण हे आहे.

२.२.४ एका किंवा एकाहून अधिक सामाईक भागीद्रार असलेल्या व एकाच उद्योग क्षेत्रात असलेल्या विविधा संस्था उदा., उत्पादन, प्रक्रिया, व्यापारी उपक्रम इत्यादी करणा-या संस्थांना संलग्न समूह म्हणून बघितले गेले पाहिजे आणि सामाईक मालकीसह एकत्र येणा-या एककांना एकच पक्ष म्हणून बघितले गेले पाहिजे.

२.२.५ असुरक्षित अग्रिम राशींमध्ये स्पष्ट अधिकर्ष (क्लीन ओव्हरड्राफ्टस), व्यक्तिगत जामीनासह दिलेले कर्ज किंवा विकत घेतलेल्या/ दिलेल्या मुलतानी हुंड्या, विकत घेतलेले धानादेश आणि धानादेशांनुसार गोळा करण्यासाठी काढलेल्या रकमा ह्यांचा समावेश असेल; परंतु त्यात पुढील घटकांचा समावेश नसेल-

i) केंद्र किंवा राज्य सरकार, सार्वजनिक क्षेत्रातील वित्तासंस्था, बँका आणि डिपॉझिट इन्शुरन्स आणि क्रेडिट गारंटी कॉर्पोरेशनद्वारे हमी देण्यात आलेल्या अग्रिम रक्कम;

ii) योग्य त्या अधिकारयंत्रणेद्वारे परीक्षण सूचना किंवा मिळालेल्या चलनासह केंद्र किंवा राज्य सरकारांद्वारे किंवा सरकारी मालकीच्या संस्थेद्वारे काढण्यात आलेली पुरवठा बिले;

iii) ट्रस्ट रिसिप्टसह असलेल्या अग्रिम रक्कम;

iv) कर्जाच्या पत्रासह काढण्यात आलेले आंतर्देशीय भोजनभत्ता (डी/ए) बिले

v) ९० पेक्षा कमी दिवसांच्या आत वापरण्यात आलेली व आंतर्देशीय भोजनभत्ता (डी/ए) बिलांसह असलेली अग्रिम रक्कम (जरी अशी बिले कर्जाच्या पत्रासह काढण्यात आलेली नसली तरी).

vi) जेव्हा संबंधित राज्य सहकारी संस्था अधिनियमामध्ये बँकेच्या दाव्यांच्या पूर्ततेसाठी कर्मचा-याच्या मासिक वेतनातून ठराविक कालावधीच्या कर्जासाठी हप्ते वजा करण्याची बंधनकारक तरतूद असेल आणि अशा प्रकारच्या प्रत्येक अग्रिम रकमेच्या संदर्भात बँकेने ह्या तरतुदीचा लाभ घेतला असेल, तर व्यक्तिगत जामीनासह वेतनमान प्राप्त असलेल्या कर्मचा-यांना देण्यात येणा-या अग्रिम रकमा;

vii) प्रतिष्ठित खाजगी पक्षांद्वारे जारी करण्यात आलेली पुरवठा बिले आणि सार्वजनिक लि. कंपन्या आणि नावाजलेल्या संस्था ह्यांच्या पावतीसह असलेल्या चलानवर काढण्यात आलेल्या पुरवठा बिलांवरील अग्रिम रकमा ज्यामध्ये ९० पेक्षा अधिक दिवसांची थकबाकी नसेल.

viii) ९० दिवसांपेक्षा अधिक थकबाकी नसलेल्या पुस्तकी कर्जावरील अग्रिम रकमा.

ix) सरकार, सार्वजनिक महामंडळ आणि स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे देण्यात आलेले धानादेश.

x) निर्यातीसाठी पॅकिंग करताना लागणा-या कर्जाच्या स्वरूपातील अग्रिम रक्कम.

xi) विकत घेतलेले डिमांड ड्राफ्टस.

xii) अंशतः सुरक्षित असलेल्या अग्रिम रकमेतील सुरक्षित भाग, आणि

xiii) देय असलेल्या किंवा देय होणा-या कंत्राटी रकमेतील कायदेशीर कार्याशी संबंधित असलेली अग्रिम रक्कम.

**सूचनाः** भारतीय रेल्वे किंवा इंडियन एअरलाईन्स कॉर्पोरेशन किंवा रस्ता आणि जल परिवहन चालकांच्या अधिकृत पावती नसलेल्या विनिमयाची सर्व बिले ज्यांना प्राथमिक सहकारी बँकेच्या संचालक मंडळाद्वारे प्रमाणित केले गेले असेल, त्यांना स्वच्छ बिले समजण्यात येईल.

२.२.६ जेव्हा संस्थांमध्ये प्राथमिक सहकारी बँकेचा संचालक किंवा त्याचे नातेवाईक ह्यांचे हित गुंतले आहे, असे म्हंटले जाईल, तेव्हा त्याचा अर्थ पुढीलप्रमाणे असेल-

i) प्रोप्रायटरी संस्था/ भागीदारीतील संस्था (ज्यामध्ये अविभक्त हिंदु कुटुंबातील व्यक्तींच्या संस्था सनाविष्ट असतील); ज्यामध्ये बँकेचा संचालक किंवा त्याचा नातेवाईक प्रोप्रायटर/ भागीदार/ सह- चालक म्हणून असेल व त्या प्रकारे त्याचा हितसंबंधा असेल

ii) खाजगी/ सार्वजनिक लि. कंपन्या; ज्यामध्ये बँकेचा एक संचालक कंपनीला देण्यात आलेल्या कर्जाच्या व अग्रिम रकमेच्या परताव्यासाठी हमीदार असेल.

२.२.७ बँकेच्या संचालकाचा 'नातेवाईक' म्हणजे पुढीलपैकी त्या संचालकाचा कोणताही नातेवाईक असेल.
पुढील परिस्थिती पूर्ण होत असेल तर आणि तरच एखाद्या व्यक्तीस दुस-या व्यक्तीचा नातेवाईक म्हंटले जाईलः

(a) जर ते अविभक्त हिंदु कुटुंबातील सदस्य असतील; किंवा

(b) ते पती- पत्नी असतील; किंवा

(c) एक व्यक्ती दुस-या व्यक्तीसोबत पुढील प्रकारे संबंधित असेल-

i) वडील

ii) आई (सावत्र आईसह)

iii) मुलगा (सावत्र मुलासह)

iv) मुलाची पत्नी

v) मुलगी (सावत्र मुलीसह)

vi) मुलीचा पती

vii) भाऊ (सावत्र भावासह)

viii) भावाची पत्नी

ix) बहिण (सावत्र बहिणीसह)

x) बहिणीचा नवरा

२.२.८ 'अन्य कोणतेही आर्थिक स्थान; ह्या शब्दांच्या अर्थामध्ये निधी असलेल्या व निधी नसलेल्या कर्ज मर्यादा आणि जामीन व खालीलप्रमाणे समान दायित्व असेलः

(i) निधी असलेल्या मर्यादांमध्ये बिले विकत घेण्यातील सूट, माल पाठवण्याआधी आणि नंतर असलेल्या पत सुविधा आणि बदललेल्या रकमेच्या हमी- मर्यादा ह्यांचा समावेश असून भांडवल तरतुदीसह कोणत्याही उद्देशासाठी बदललेल्या असताना आणि त्या संदर्भात मान्यता असलेल्या जारी करण्याच्या स्वीकृतीच्या अशा मर्यादा ज्या कर्जदारांना आणि हमीदारांना जारी करण्यात येतील व ज्या द्वारे भांडवली साधाने प्राप्त करण्यासाठी बँक तिच्या घटकांद्वारे अनिवार्य आर्थिक दायित्व मिळवू शकेल.

(ii) निधी नसलेल्या मर्यादेमध्ये कर्जपत्रके, जामीन, हमी व अन्य तशा प्रकारचे दायित्व असले पाहिजे.

**२.३ जमिनी मालमत्ता (रिअल इस्टेट) क्षेत्रातील रकमेची मर्यादा**

प्राथमिक (नागरी) सहकारी बँकांना त्यांच्या संचालक मंडळाच्या मान्यतेसह जमिनी मालमत्तोवर दिल्या जाणा-या एकूण कर्जाच्या मर्यादेशी संबंधित महत्तवपूर्ण व व्यापक नियम बनवण्याचा सल्ला दिला जातो व हे करताना त्यांनी रिजर्व बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार खात्री केली पाहिजे, की बँकेच्या कर्जाचा उपयोग बांधाकामासाठी होत असून पुढीलप्रमाणे कोणतीही कृती त्या जमिनी मालमत्तोच्या संदर्भात केली जात नाही.

२.३.१ युसीबीजची गृह, जमीन मालमत्ता आणि व्यपारी जमिनी मालमत्तोच्या कर्जांवरील रक्कम १५ नोव्हेंबर २०१० पासून जमा रकमेच्या १५% ऐवजी त्यांच्या एकूण साधानांच्या १०% इतकी मर्यादित करण्यात आली आहे. त्यांच्या एकूण साधानांच्या १०% पेक्षा अधिक असुरक्षित कर्ज आणि अग्रिम रकमा असलेल्या युसीबीजना त्यांच्याद्वारे देण्यात येणारी रक्कम १५ नोव्हेंबर २०१० पासून पुढील सहा महिन्यांच्या आत सुधारित मर्यादेमध्ये आणण्यासाठी प्रयत्न करावे लागतील.

२.३.२ एकूण साधानांच्या १० टक्के ही वरील मर्यादा रूपये १० लाख पर्यंतच्या व्यक्तिगत गृहकर्जासाठी किंवा निवासी संकुलाच्या व्यक्तिगत खरेदीसाठी किंवा बांधाकामासाठी एकूण साधानांच्या ५% इतक्या प्रमाणात अतिरिक्त मर्यादेसह वाढवली जाऊ शकते (दिनांक ११ मे, २०११ च्या युबीडी. बीपीडी. (पीसीबी) परिपत्रक क्र. ४७/१३.०५.०००/२०१०-११ ह्या परिपत्रकानुसार गृहकर्ज रूपये १५ लाखपर्यंत दिले जाऊ शकते.)

२.३.३ आधीच्या आर्थिक वर्षाच्या ३१ मार्च रोजी असलेल्या लेखा परीक्षण केलेल्या ताळेबंद पत्रकाच्या आधारे एकूण साधानांची गणना केली जाऊ शकते. एकूण साधानांची गणना करताना तोटे, अमूर्त साधाने, मिळालेल्या बिलांसारख्या प्रतिनोंदी (कॉंट्रा आयटम्स) त्यातून वगळले जातील.

२.३.४ जर अग्रिम रक्कम न घेता कंत्राटदार सापेक्षतः लहान बांधाकाम स्वतःच्या बळावर करत असेल तर अशा कंत्राटदारांना देण्यात आलेल्या बांधाकाम साहित्यासाठी तारणगहाणावर युसीबीजद्वारे देण्यात आलेले कार्यात्मक भांडवली कर्ज वर उल्लेखलेल्या मर्यादेमध्ये धारले जाणार नाही.

२.३.५ आधी युसीबीजना गृह, जमिनी मालमत्ता, व्यापारी जमिनी मालमत्ता आदिच्या कर्जासाठी असलेल्या अनुदानाच्या मर्यादेला त्यांना उच्च आर्थिक संस्था आणि राष्ट्रीय गृह बँकेकडून मिळालेल्या पुनर्वित्तासेवेच्या निधीच्या प्रमाणात ओलांडण्याची अनुमती होती. युबीडी. बीपीडी. (पीसीबी) परिपत्रक क्र. ४७/१३/०५.०००/२०१०-११ दिनांक ११ मे, २०११ ह्या परिपत्रकानुसार ही अनुमती काढून घेण्यात आलेली आहे.

**२.४ आंतर- बँक रकमेची मर्यादा**

**प्रुडंशिअल आंतर बँक (एकूण) रकमेची मर्यादा (प्रुडंशिअल इंटर बँक गॉस एक्स्पोजर लिमिट)**

२.४.१ कॉल मनी/ नोटिस मनी आणि असल्यास जमा रकमांच्या उद्देशासह क्लीअरिंग सुविधा मिळण्यासाठी, सीएसजीएल सुविधा, करंसी चेस्ट सुविधा, वित्ताप्रेषण (रिमिटन्स) सुविधा आणि बँक जामीन, कर्जपत्रक आदि निधी व्यतिरिक्त असलेल्या सुविधा मिळण्यासाठी युसीबीद्वारे अन्य बँकांसह (आंतर- बँक) ठेवण्यात आलेल्या जमा रकमा बँकेच्या आधीच्या वर्षी ३१ मार्च रोजी असलेल्या एकूण जमा दायित्वाच्या २०% पेक्षा अधिक नसाव्यात. जमा खात्यांमध्ये व्याणिज्यिय बँकांसह आणि अनुसूचित युसीबीजसह ठेवण्यात आलेली शिल्लक व वाणिज्यिय बँकांद्वारे जारी करण्यात आलेल्या जमा प्रमाणपत्रातील गुंतवणूकी ह्या आंतर- बँक रकमेत असल्यामुळे ह्या २०% मर्यादेत समाविष्ट करण्यात येतील.

**प्रुडंशिअल आंतर- बँक काउंटर पार्टी मर्यादा**

२.४.२ महत्तवपूर्ण आंतर बँक (एकूण) रकमेच्या मर्यादेमध्ये, एका बँकेसह ठेवलेली जमा रक्कम ती रक्कम ठेवणा-या बँकेच्या आधीच्या वर्षी ३१ मार्च रोजी असलेल्या एकूण जमा दायित्वाच्या 5% पेक्षा अधिक नसली पाहिजे.

**प्रुडंशिअल मर्यादेमधील अपवाद**

संबंधित जिल्हा मधयवर्ती सहकारी बँकेसह किंवा त्या राज्याच्या राज्य सहकारी बँकेसह युसीबीद्वारे जतन केलेल्या रकमा बँकिंग नियमन अधिनियम, १९४९ (एएसीएस) च्या कलम २४ मधील तरतुदींनुसार प्रुडंशिअल आंतर बँक (एकूण) रकमेच्या मर्यादेमधील अपवाद केला जातो (परिच्छेद २.४.१ आणि २.४.२)

२.४.३ अनुसूचित नसलेल्या पीसीबीजद्वारे अनुसूचित पीसीबीजसह ठेवल्या जाणा-या जमा रकमा
२.४.३.१ अनुसूचित नसलेल्या पीसीबीजना पुढील नियमांच्या पूर्ततेसह सक्षम अनुसूचित पीसीबीजमध्ये रकमा जमा करण्याची अनुमती आहेः

i) बँक सीआरएआरच्या निर्देशित पातळीचे पालन करते.

ii) बँकेचा निव्वळ एनपीए 7% पेक्षा कमी आहे.

iii) बँकेने सीआरआर/एसएलआर चे जतन करण्यामध्ये गेल्या दोन वर्षांमध्ये कसूर केलेली नाही.

iv) बँकेने गेल्या तीन सलग वर्षांमधील निव्वळ नफ्याची माहिती उघड केलेली आहे.

v) उत्पन्न मान्यता, साधानांचे वर्गीकरण व तरतुदी, रकमेवरील मर्यादा आणि संचालकांना देण्यात आलेली कर्जे व अग्रिम रकमा ह्यांच्याशी निगडीत प्रुडंशिअल नियमांचे पालन बँकेने केले आहे.

vi) अनुसूचित नसलेल्या युसीबीद्वारे कोणत्याही अनुसूचित युसीबीमध्ये ठेवण्यात येणारी रक्कम ती रक्कम ठेवणा-या बँकेच्या आधीच्या वर्षी ३१ मार्च रोजी असलेल्या एकूण जम दायित्वाच्या 5% पेक्षा अधिक नसली पाहिजे.

२.४.३.२ अनुसूचित नसलेल्या युसीबीजकडून अनुसूचित युसीबीजला मिळणा-या रकमेची स्वीकृतीसुद्धा पुढील अटींनुसार होईलः

i) अनुसूचित युसीबीद्वारे आंतर- युसीबी पद्धतीने मिळणारी एकूण जमा रक्कम आधीच्या आर्थिक वर्षी ३१ मार्च रोजी असलेल्या तिच्या जमा दायित्वाच्या १०% पेक्षा अधिक नसली पाहिजे.

ii) अशा जमा रकमांवर लावण्यात आलेला व्याज दर मार्केटप्रमाणे असला पाहिजे.

iii) परंतु तरीही अनुसूचित युसीबीजनी अन्य अनुसूचित/ अनुसूचित नसलेल्या युसीबीजसह रक्कम जमा करू नये.

**३. असुरक्षित अग्रिम रकमा (हमीसह आणि हमीशिवाय)**
**३.१ एक पक्ष/ संलग्न समूहासाठी असलेली मर्यादा**

(a) एका पक्ष/ संलग्न कर्जदार समूहासाठी असुरक्षित अग्रिम रकमेसाठी (हमीसह) अधिकतम मर्यादा १४ नोव्हेंबर २०१० पर्यंत पुढीलप्रमाणे होती.

| **अग्रिम रकमेचा प्रकार** | डीटीएल खालीलप्रमाणे असलेली अनुसूचित नसलेली युसीबी | | अनुसूचित युसीबी |
|---|---|---|---|
| | रूपये १० कोटींपेक्षा कमी | रूपये १० कोटी किंवा अधिक | |
| स्तर I म्हणून वर्गीकृत<br>स्वच्छ बिले/विकत घेतलेल्या किंवा दिलेल्या मुलतानी हंड्या आणि संकलनासाठी पाठवलेल्या धानादेशाप्रमाणे काढलेल्या रकमा ह्यांसह सर्व प्रकारच्या असुरक्षित अग्रिम रकमा | रू.५०,०००/- | रू.१,००,०००/- | रू.२,००,०००/- |
| **स्तर II, III किंवा IV म्हणून वर्गीकृत** | रू.25,०००/- | रू.50,०००/- | रू.50,०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (b) युसीबीज हमीशिवाय असुरक्षित अग्रिम रकमा खालील मर्यादांमध्ये फक्त ३० दिवसांच्या तात्पुरत्या कालावधीसाठी विशेष परिस्थितीमध्ये फक्त खरेदी/ सूट/ तिस-या पक्षाने धानादेशासह काढलेल्या रकमा ह्यांच्या संदर्भातच देऊ शकतात.<br><br>बँकांचा प्रवर्ग | स्तर | मर्यादा | स्तर | मर्यादा |
| अनुसूचित | III o IV स्तरावरील युसीबीज | रू.२५,०००/- | III o IV स्तराशिवाय अन्य स्तरांवरीला युसीबीज | रू.५०,०००/- |
| अनुसूचित नसलेल्या | -‘‘- | रू.१०,०००/- | -‘‘- | रू.२०,०००/- |

३.१.१ असुरक्षित अग्रिम रकमा (हमीसह किंवा हमीशिवाय) १५ नोव्हेंबर २०१० पासून सुधारित करण्यात आल्या आहेत. सुधारित मर्यादा पुढीलप्रमाणे आहेत.

| व्यक्तिगत कर्जदार आणि कर्जदार समूहासाठीच्या मर्यादा<br>निकष | रू. १० कोटी पर्यंत असलेल्या युसीबीज | डीटीएल रू. १० कोटी पेक्षा अधिक व रू. ५० कोटी पर्यंत असलेल्या युसीबीज | डीटीएल रू. ५० कोटी पेक्षा अधिक व रू.१०० कोटी पर्यंत असलेल्या युसीबीज | डीटीएल रू. १०० कोटी पेक्षा अधिक |
|---|---|---|---|---|
| सीआरएआर ९% इतका किंवा अधिक असलेल्या युसीबीज | रू.१.०० लाख | रू. २.०० लाख | रू. ३.०० लाख | रू. ५.०० लाख |
| सीआरएआर ९% पेक्षा कमी असलेल्या युसीबीज | रू. ०.२५ लाख | रू. ०.५० लाख | रू. १.०० लाख | रू. २.०० लाख |

**३.२ असुरक्षित अग्रिम रकमेवरील एकूण मर्यादा**

युसीबीजद्वारे तिच्या सदस्यांना देण्यात येणारे एकूण असुरक्षित कर्ज आणि अग्रिम रकमा (हमीसह किंवा हमीशिवाय किंवा धानादेश खरेदीसाठी) तिच्या मागणी आणि कालावधी दायित्वाच्या (डीटीएल) १५% च्या ऐवजी १५ नोव्हेंबर २०१० पासून पुढे आधीच्या आर्थिक वर्षात ३१ मार्च रोजीच्या तिच्या लेखा परीक्षण केल्या गेलेल्या ताळेबंद पत्रकातील एकूण साधानांच्या १०% पेक्षा अधिक नसाव्यात. एकूण साधाने तोटे, अमूर्त साधाने आणि प्राप्त झालेली बिले अशा काँट्रा आयटम्स ह्यांच्याशिवाय निव्वळ मोजली गेली पाहिजेत.

ज्या कर्जदारास आणखी एका बँकेकडून आधीच कर्ज सुविधा मिळत आहेत, त्या व्यक्तीने त्या बँकेकडून 'ना हरकत प्रमाणपत्र' प्राप्त केल्याशिवाय कोणत्याही बँकेने त्या अर्जदारास वित्तसेवा देऊ नये आणि ज्यावेळेस कर्जदाराला मिळत असलेल्या कर्ज सुविधांची एकूण संख्या एका पक्षासाठी निर्देशित केलेल्या मर्यादेपेक्षा अधिक असेल, तेव्हा आधी रिजर्व बँकेची मान्यता घेणे आवश्यक असेल.

३.२.१ वेतन स्वीकारणा-या बँका एखाद्या विशिष्ट संस्थेच्या/ संस्थेच्या समूहाच्या मर्यादित सदस्यता असलेल्या कर्मचा-यांना अग्रिम वेतन देत असते आणि त्यांच्या कर्मचा-यांच्या वेतनातून रकमा वजा केल्या जातात, ह्या वस्तुस्थितीच्या संदर्भात, वेतन स्वीकारणा-या बँका पुढील अटींसह अशा अग्रिम रकमा वर दिलेल्या मर्यादांपेक्षा अधिक प्रमाणात देऊ शकतात-

(i) संबंधित राज्याच्या सहकारी संस्था अधिनियमामध्ये ठराविक कालावधीच्या कर्जाचे हप्ते बँकेत भरण्यासाठी रोजगार देणारी संस्था कर्मचा-यांच्या वेतन भत्तयातून हप्ते कापून घेण्याची बंधनकारक तरतूद असेल.

(ii) अशा प्रकारच्या प्रत्येक अग्रिम रकमेच्या संदर्भात बँकेने ह्या तरतुदीचा लाभ घेतला असेल.

(iii) अशा अग्रिम रकमेसाठी बँकेने कर्मचा-यांचे मासिक उत्पन्न लक्षात घेऊन ठराविक प्रमाणात हप्त्यांची संख्या ठरवून बँक अशा अग्रिम रकमेची मर्यादा निश्चित करू शकते.

३.२.२ प्राथमिक (नागरी) सहकारी बँकांद्वारे देण्यात येणा-या वेतन मिळवणा-या संस्थेव्यतिरिक्तच्या अन्य वेतनप्राप्त कर्जदारांना देण्यात येणा-या अग्रिम अशा रकमा; ज्यांमध्ये राज्यातील सहकारी संस्था अधिनियमाच्या तरतुदींनुसार कर्जदाराच्या वेतनांमधाला हिस्सा कापून घेऊन परताव्याची निश्चिती केली जाते, त्या रकमांची गणना संपूर्ण सदस्यांना देण्यात येणा-या एकूण असुरक्षित अग्रिम रकमेच्या संदर्भासाठीच सुरक्षित म्हणून केली जावी. व्यक्तिगत वेतनप्राप्त कर्जदारांना अग्रिम रकमा देताना बँकांनी खात्री केली पाहिजे, की परिच्छेद ३.१ (ए) मध्ये नमूद केलेली असुरक्षित अग्रिम रकमांवरची महत्ताम मर्यादा ओलांडली जाणार नाही.

**४. बंधनकारक निर्बंध**

**४.१ बँकेच्या स्वतःच्या समभागांच्या विरुद्ध अग्रिम रकमा**

बँक नियमन अधिनियम १९४९ (सहकारी संस्थांना लागू असलेला भाग) च्या कलम २० (१) (ए) नुसार प्राथमिक (नागरी) सहकारी बँक तिच्या स्वतःच्या समभागांच्या सुरक्षिततेच्या विरुद्ध कर्ज आणि अग्रिम रकमा देऊ शकत नाही.

**४.२ कर्ज विमोचन करण्याच्या अधिकारांवरील निर्बंध**

४.२.१ बँक नियमन अधिनियम १९४९ (सहकारी संस्थांना लागू असलेला भाग) च्या कलम २० (१) (ए) नुसार प्राथमिक (नागरी) सहकारी बँक रिजर्व बँकेच्या आधी घेतलेल्या मान्यतेशिवाय तिच्याकडे असलेल्या कर्जाचे किंवा कर्जाच्या कोणत्याही भागाचे विमोचन पुढील प्रकारांशिवाय अन्य प्रकारे करू शकत नाही-

(i) तिच्या भूतपूर्व किंवा विद्यमान संचालकांपकी कोणीही

(ii) अशी कोणतीही संस्था किंवा कंपनी ज्यामध्ये तिचे कोणतेही संचालक संचालक, भागीदार, व्यवस्थापकीय एजन्ट किंवा जामीन म्हणून संलग्न असतील, किंवा

(iii) अशी कोणतीही व्यक्ती, ज्याचा भागीदार किंवा जामीनदार एखादा संचालक आहे.

४.२.२ वर उल्लेखलेल्या अधिनियमाच्या कलम २०-ए (२) नुसार, उपकलम (१) च्या तरतुदींच्या उल्लंघनास कारणीभूत ठरेल असे कोणतेही विमोचन केल्यास वरील स्थिती व तिचा परिणाम रद्दबादल ठरेल.

**५. नियामक तरतुदी**

**५.१ संचालक आणि त्यांचे नातेवाईक ह्यांना कर्ज आणि अग्रिम रकमा देणे**

५.१.१ १ ऑक्टोबर २००३ पासून, प्राथमिक (नागरी) सहकारी बँकांना त्यांचे संचालक किंवा त्यांचे नातेवाईक आणि संस्था/ कंपन्या/ कन्सर्न्स ज्यांमध्ये त्यांचे हितसंबंधा असतील, त्यांना सुरक्षित किंवा असुरक्षित कर्ज आणि अग्रिम रकमा किंवा अन्य कोणतीही आर्थिक सुविधा देण्यापासून, तशी तरतूद करण्यापासून किंवा तशा सेवेचे नूतनीकरण करण्यापासून प्रतिबंधित करण्यात आले आहे. आधी देण्यात आलेल्या अग्रिम रकमा त्या देय होण्याच्या तिथीपर्यंत अस्तित्वात राहू शकतील. त्या अग्रिम रकमांचे नूतनीकरण करण्यात येऊ नये अथवा त्यामध्ये विस्तार केला जाऊ नये.

५.१.२ वरील निर्देशांच्या संदर्भात संचालकांशी संबंधित पुढील प्रकारच्या कर्जदारांना वगळण्यात आले आहे.

(i) युसीबीजच्या संचालक मंडळावर असलेल्या कर्मचारी संचालकास नियमित कर्मचारी म्हणून कर्ज मिळू शकते.

(ii) सहकारी बँकांच्या वेतनप्राप्त मंडळावर असलेल्या सदस्यांना लागू असलेले सामान्य कर्ज संचालकास मिळू शकते.

(iii) बहु राज्य सहकारी बँकांच्या व्यवस्थापकीय संचालकास सामान्य कर्मचारी संबंधित कर्जे.

(iv) स्वतःच्या नावावर असलेल्या स्थायी ठेव आणि जीवन विमा पॉलिसीज ह्यांच्या आधारे संचालक व त्याच्या नातेवाईकांना कर्जे मिळू शकतात.

५.१.३ परिशिष्ट १ मध्ये दिलेल्या आराखड्यानुसार बँकांना त्यांचे संचालक आणि त्याचे नातेवाईक ह्यांना दिलेल्या कर्जाशी व अग्रिम रकमेशी संबंधित माहिती बँकांनी प्रत्येक तिमाही समाप्त (म्हणजेच ३१ मार्च, ३० जून, ३० सप्टेंबर आणि ३१ डिसेंबर) होताना ह्या विभागाच्या संबंधित क्षेत्रीय अधिका-यास तिमाही समाप्त झाल्यापासून पंधारा दिवसांच्या आत सादर करणे आवश्यक आहे.

५.१.४ प्रशासकाच्या/ प्रभारी व्यक्तीच्या हाताखाली कार्यरत असलेल्या बँकांनी ही माहिती प्रभारी व्यक्ती/ विशेष अधिकारी/ प्रशासक व त्यांच्या नातेवाईकांना देण्यात आलेल्या कर्जाच्या व अग्रिम रकमेच्या संदर्भात सादर करावी.

**५.२ सामान्य सदस्यांना अग्रिम रक्कम देण्यावरील महत्ताम मर्यादा**

**बँका सामान्य सदस्यांना अल्प/ तात्कालिक कालावधीसाठी आणि ग्राहकोपयोगी टिकाऊ वस्तुंसाठी पुढील मर्यादेनुसार कर्जे मंजूर करू शकतात- बँका**

| | | कर्ज रकमेची मर्यादा |
|---|---|---|
| (i) | रू.५० कोटी जमा रकमेसह | रू.५०,०००/- प्रति कर्जदार |
| (ii) | रू.५० कोटीपेक्षा अधिक जमा रकमेसह | रू.१,००,०००/- प्रति कर्जदार |

अन्य बँकांनी दिलेल्या स्थायी ठेवेच्या पावत्यांच्या (एफडीआरएस) अनुषंगाने देण्यात येणारी अग्रिम रक्कम

**५.३ बँकांनी अन्य बँकांनी दिलेल्या स्थायी ठेवीच्या/ टर्म डिपॉझिटसच्या अनुषंगाने अग्रिम रकमा मंजूर करणे टाळले पाहिजे.**

**५.४ ब्रिज लोन्स/ अंतरिम वित्तसेवा**

प्राथमिक (नागरी) सहकारी बँकांना ब्रिज लोन्स/ अंतरिम वित्तासेवेसाठीच्या कोणत्याही प्रस्तावास प्रतिबंधा करण्यात आला आहे आणि त्यामध्ये भांडवल/ कर्जरोखे संबंधित आणि किंवा ब्रिजिंग स्वरूपातील कर्ज. भांडवल, ठेव इत्यादी प्रकारे उपकरण भाड्याने देऊन, भाडे- खरेदी, कर्ज, गुंतवणूक आणि इतर बँकिंग व्यतिरिक्त कंपन्या ह्या सर्व प्रवर्गातील बँकिंग व्यतिरिक्त असलेल्या वित्तासंस्थांकडून/ कंपन्यांकडून बाजारपेठेत प्रलंबित असलेला दीर्घकालीन निधी उभा करणे इत्यादीचा समावेश आहे.

**५.५ समभाग, कर्जरोखे आणि रोखे ह्यांच्यासाठीची बँकेची वित्तसेवा**

**५.५.१ स्टॉक ब्रोकर्सना देण्यात येणारी बँकेची वित्तसेवा**

५.५.१.१ सुरक्षित किंवा असुरक्षित प्रकारच्या निधी आधारित किंवा निधी आधारित नसलेल्या कर्ज सुविधा समभाग आणि कर्जरोखे/ रोखे किंवा स्थायी ठेवी, जीवन विमा निगम पॉलिसीज इत्यादि जामीनावर देण्यापासून बँकांना प्रतिबंधित करण्यात आले आहे.

५.५.१.२ कमोडिटी ब्रोकरना कोणतीही सुविधा देण्याची अनुमती बँकांना देण्यात आलेली नाही. ह्यामध्ये त्यांच्या वतीने हमी देण्याचाही समावेश असेल.

५.५.१.३ म्युच्युअल फंडसच्या युनिटसवरील अग्रिम रकमा समभाग, कर्जरोखे आणि रोखे ह्यांच्या जामीनावरील अग्रिम रकमांप्रमाणेच (परिच्छेद ५.५.२) फक्त व्यक्तींनाच दिले जाऊ शकतात.

५.५.१.३ वरील सूचनेचे पालन न करणारी सधया कार्यरत असलेली कोणतीही कर्ज सुविधा तत्काळ रद्द/ बंद करण्यात यावी. ह्या संदर्भात अनुपालन अहवाल (कॉम्प्लायन्स रिपोर्ट) रिजर्व बँकेच्या संबंधित क्षेत्रीय अधिका-याकडे सादर केला जाऊ शकेल.

५.५.२ समभागांच्या/ कर्जरोख्यांच्या प्राथमिक/ बहुस्तरीय जामीनावर दिले जाणारे कर्ज जामीन भौतिक स्वरूपात असल्यास रूपये ५ लाख इतके आणि जर जामीन डिमॅट स्वरूपात असेल तर रूपये १० लाख इतके मर्यादित ठेवले गेले पाहिजे.

५.५.३ अशा सर्व अग्रिम रकमांवर ५० टक्क्यांची सीमा (मार्जिन) ठेवली गेली पाहिजे.

५.५.४ समभाग आणि कर्जरोख्यांच्या जामीनावर देण्यात आलेल्या सर्व कर्जांची बेरीज बँकेच्या मालकीच्या निधीच्या २०% इतक्या मर्यादेच्या आत असली पाहिजे.

५.५.५ बँकांनी व्यक्तिगत कर्जदारांकडून असलेली थकबाकी आणि समभागांवरील अन्य घटक ह्यांचा परिशिष्ट २ मध्ये दिलेल्या आराखड्यानुसार रिजर्व बँकेच्या संबंधित क्षेत्रीय कार्यालयांमध्ये तिमाही पद्धतीने अहवाल सादर करणे आवश्यक आहे.

५.५.६ समभागांना जामीन म्हणून स्वीकारण्याआधी बँकांनी योग्य ती जोखीम व्यवस्थापन प्रणाली चालू करणे आवश्यक आहे. कमीत कमी दोन महिन्यातून एकदा बँकेच्या लेखापरीक्षण समितीपुढे सर्व मान्य केलेले कर्ज प्रस्ताव ठेवले गेले पाहिजेत. व्यवस्थापन आणि लेखापरीक्षण समितीने खात्री घ्यावी की, समभागांच्या विरुद्ध असलेले सर्व कर्ज फक्त अशा व्यक्तींनाच दिले गेले आहेत, जे कोणत्याही प्रकारे स्टॉक ब्रोकिंग संस्थेशी निगडीत नाहीत. मंजूर केलेल्या कर्जाचे तपशील पुढील बैठकीमध्ये संचालक मंडळास दिले गेले पाहिजेत.

**५.६ प्राधान्य समभाग आणि दीर्घ मुदतीच्या (दुय्यम) ठेवींसाठी बँकेच्या वित्तसेवा**

प्राथमिक (नागरी) सहकारी बँकांनी इतर बँकांद्वारे देण्यात आलेल्या शाश्वतच्या एकत्रित नसलेल्या प्राधान्य समभागांमध्ये (टायर १), सातत्यपूर्ण एकत्रित प्राधान्य समभागांसारख्या अन्य प्राधान्य समभागांमध्ये (टायर २), विमोचन होणारे एकत्रित नसलेले प्राधान्य समभाग, विमोचन होणारे एकत्रित प्राधान्य समभाग आणि तसेच दीर्घ मुदतीच्या (दुय्यम) ठेवी (टायर ३) ह्यामध्ये गुंतवणूक करू नये आणि तसेच त्यांच्याद्वारे किंवा अन्य बँकांद्वारे देण्यात आलेल्या वरील दस्तावेजांवर त्यांनी कोणतीही अग्रिम रक्कम देऊ नये.

